

कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर.
जावक क्रमांक ४९०५ /२०१७,
दि.२५/०९/२०१७.

**प्रति,**

मा.जनसंपर्क अधिकारी सो,
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर.

**प्रतिवेदक**:-एस.पी.शिंदे,पोलीस उप निरीक्षक,कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर,
यांजकडुन विनंतीपुर्वक की,

**विषय** :- पळवुन नेलेल्या मुलाचा शोध होणेकामी वर्तमान पत्रात प्रसिध्दी होणेबाबत....

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, कोंढवा पोलीस स्टेशन भाग ५,गु.रजि.नं.३८२/२०१७ भा.द.वि.कलम ३६३ मधील फिर्यादी नामे रेशमा गौस शेख वय ३५ वर्षे धंदा गृहिणी रा.२४७,सिध्द नं.३,सिध्देश्वर नगर,भाग क्र.४,मजरेवाडी ता.उत्तर सोलापुर जिल्हा सोलापुर,मो.नं.९०११९९८७७७.यांनी तक्रार दिली की,त्यांचा मुलगा नामे इजाज गौस शेख,वय १५ वर्षे,धंदा शिक्षण हा तालाब मदरसा,तालाब मस्जीद,कोंढवा बु पुणे याठिकाणी धार्मिक शिक्षण घेत असतांना त्यास दि.२३/०९/२०१७ रोजी २०.०० वा.चे सुमारास तालाब मदरसा,तालाब मस्जीद,कोंढवा बु पुणे येथुन कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचे तरी आमिश दाखवुन फुस लावुन पळवुन नेले आहे.म्हणुन वरीलप्रमाणे गुन्हा नोंद आहे.

त्याचे वर्णन :- नाव इजाज गौस शेख,वय १५ वर्षे,धंदा शिक्षण,रंगाने सावळा,अंगाने मध्यम,नाक सरळ,चेहरा ऊभट,इ.७ वी पर्यंत शिक्षण झालेले,मराठी,हिंदी,ऊर्दु भाषा येते,अंगात पांढरा कुर्ता व पायजमा,डोक्यात टोपी,जवळ मौल्यवान चीजवस्तु अगर पैसे नाहीत.

तरी वर नमुद वर्णनाचे मुलाचा तपास होणेकामी सर्व वर्तमान पत्रातुन त्यांचे वर्णनाची माहीती प्रसिध्द होणेस विनंती आहे.